**अर्जदार तर्फे साक्षीदार क्र. २ चा उलटतपास गैरअर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. जे. के. देशपांडे यांच्यामार्फत शपथेवर सुरु**

१३. मी हलगरा येथील मिळकत नंबर १३१/१ मध्ये राहतो. दिवाणी दावा क्र. २१६/२०१५ मी माझ्या भावाविरुध्द दाखल केला होता. त्या दाव्यातील मजकूर बरोबर आहे. तो दावा नामंजूर झाला आहे. हलगरा मध्ये मिळकत नंबर १३१/१ शिवाय माझ्याकडे अन्य कोणतीही मिळकत नाही. मी पोलिस विभागात नोकरी केली आहे. मी सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक या पदावरुन सेवानिवृत्त झालो आहे. मी अर्जदारच्या लग्नात १.५ तोळा सोने हुंडा आणि इतर खर्च ७,००,०००/– रुपये केला याचा माझ्याकडे कागदोपत्री पुरावा नाही. लग्नानंतर मी प्रभावतीच्या सासरी किती वेळा गेलो ते मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रभावती जेवढे दिवस सासरी राहिली त्या कालावधीतील तीच्या सासरच्यांबद्दल आमची तक्रार नव्हती. ती तक्रार मी सेवानिवृत्त झाल्यापासून चालु झाली. त्या त्रासाबद्दल माझ्या मुलीने कोठेही तक्रार केलेली नव्हती. गैरअर्जदार क्र.२ ते ७ यांच्याविरुध्द माझ्या मुलीने महिला तक्रार निवारण केंद्राकडे तक्रार करण्यापूर्वी कोठेही तक्रार केलेली नव्हती.

१४. अर्जदारला गैरअर्जदार शारीरिक व मानसिक त्रास देऊ लागले हे मला माझ्या मुलीकडून कळलेले आहे. गैरअर्जदाराने ५,००,०००/– रुपये ऑक्टोबर २०१६ मध्ये माझ्या घरी हलगरा येथे येऊन मागणी केले होते. ती मागणीची तारिख मला आठवत नाही. ती मागणी दोन– तीन वेळा केली होती. माझ्याकडे एकदाच पैशाची मागणी केली होती. सदर मागणीबाबत माझ्याकडे माझ्याशिवाय अन्य पुरावा नाही.

१५. मी प्रभावतीकडे कामोठा येथे असताना एकदा गेलो होतो. ती तारिख मला आठवत नाही. मी २०१४ मध्ये गेलो होतो. गैरअर्जदार बेपत्ता असल्याची चौकशी मी पोलिस स्टेशन, गुन्हे अधिवेशन विभाग, महिला आयोग व इतर ठिकाणी चौकशी

केली होती. त्या मिसींग केस मध्ये माझा जबाब घेतला नव्हता. सदर केस नंतर गैरअर्जदार २५.०६.२०१६ रोजी पोलिस स्टेशनला आल्यानंतर माझी भेट झाली. त्यावेळेस गैरअर्जदारने पोलिसांना माझ्या मुलीला आणि नातवाला सांभाळतो असे लिहून दिले होते. गैरअर्जदारचा तो जबाब मी दाखल केलेला नाही. त्यानंतर दि.०६.०७.२०१६ रोजी मी कामोठ्यावरुन हलगरा येथे परत आलो. त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ आणि माझी भेट झालेली नाही. गैरअर्जदारने अर्जदारला नांदवण्यास तयार नाही असे म्हणाल्याचा माझ्याकडे लेखी पुरावा नाही. मी ३१.१०.२०१५ रोजी सेवानिवृत्त झालो आहे. हे म्हणणे खरे नाही की, सेवानिवृत्तीपासून मी महाराणा प्रताप नगर, बाभळगाव, लातूर येथे राहतो. कृष्णा अपार्टमेंट मधील तिसरा मजल्यावरील फ्ॅटवर माझा मुलगा राहतो.

१६. गैरअर्जदार क्र.१ सध्या नोकरी करतो. तो कोठे नोकरी करतो हे मला आठवत नाही. त्या फ्ॅटचे वर्णन मला आठवत नाही. त्या फ्ॅटपासून दर महा २५,०००/– भाडे मिळते याचा माझ्याकडे पुरावा नाही. गैरअर्जदारच्या उत्पन्नाबाबतचा स्त्रोत मी स्वतः पडताळणी करुन पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी लग्नामध्ये ७,००,०००/– रुपये खर्च केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार पुणे येथे सॉफ्टवेअर कंपनीमध्ये नोकरी करतो. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार बेरोजगार आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार यांनी अर्जदारचा शारीरिक व मानसिक छळ केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदारने मुंबई येथे फ्ॅट घेण्यासाठी ५,००,०००/– रुपये मागितले आणि त्यासाठी अर्जदाराचा छळ केला असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या चेतावणीमुळे अर्जदार गैरअर्जदार यांचा संसार व्यवस्थीत होत नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या नोकरीचा धाक दाखवून गैरअर्जदारला त्रास देत होतो. हे

म्हणणे खरे नाही की, माझ्या चिथावणीमुळे आणि अर्जदारच्या जाचामुळे गैरअर्जदारला घर सोडून जावे लागले. हे म्हणणे खरे नाही की, माझे शपथपत्र परिच्छेद क्र. ६ मधील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, तंटा मुक्ती अध्यक्षांकडे तक्रार केल्याची मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०७.०७.२०१६ रोजी मुरुड येथे गैरअर्जदार कडे गेलो असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदारने अर्जदारला परत घेऊन जा ठेऊन घेणार नाही असे बोलल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदारने अरेरावीची भाषा बोलून आमच्या नातेवाईकांसह आम्हाला हाकलून दिले असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, महिला तक्रार निवारण केंद्रामध्ये गैरअर्जदारने नांदवण्यास नकार दिला असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, ऑक्टोबर २०१६ मध्ये गैरअर्जदार हलगरा येथे माझ्या घरी आले असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र.१ ने ५,००,०००/– रुपये आणल्याशिवाय नांदण्यास यायचे नाही असे सांगितल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार यांनी माझ्या मुलीला मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. २५.११.२०१६ रोजी मी खोटी तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलिस खात्यातील ओळखीचा फायदा घेऊन मी खोटी तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदारकडे उत्पन्नाचे साधन नाही असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार शिवणकाम व शाळामध्ये नोकरी करते. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार याला रुपये २,५०,०००/– पगार असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, बदलापूर येथील फ्लॅट सध्या गैरअर्जदार क्र.१ कडे असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदारला उत्पन्न मिळत नाही.

१७. अर्जदार गैरअर्जदार यांचे अरेंज मॅरेज आहे. हे म्हणणे खरे नाही की,

गैरअर्जदार काळा असल्याने माझ्या मुलीला पसंत नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदारला गैरअर्जदार पसंत नसल्याने त्यांच्या संसारात अडचणी आल्या. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हिच गैरअर्जदारचा जाच करत होती. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदारच्या हट्टामुळे गैरअर्जदारने मुंबई येथे घर घेतले. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार गैरअर्जदारच्या दिसण्यामुळे त्याच्यासोबत राहण्यास नकार देत होती. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदारचे कुटूंबीय अशिक्षीत असल्याने अर्जदार त्याला त्याच्या घरच्यांपासून वेगळे राहण्यास सांगत होती. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदारला त्याच्या कुटूंबापासून वेगळे रहा असे सांगत होतो. हे म्हणणे खरे नाही की, दि. २९.०६.२०१६ रोजी गैरअर्जदार अर्जदारला समजावून सांगुन परत नेण्यासाठी आला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी अर्जदारने त्याच्या कुटूंबासोबत नाते सोडणार असाल तर येते असे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदारने अर्जदारचा शारीरिक, मानसिक छळ केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, कोणत्याही कारणाशिवाय अर्जदार गैरअर्जदार पासून विभक्त् राहत आहे. हे म्हणणे खरे नाही की, हलगरा येथील मिळकतीचा ताबा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदारांना त्रास देण्याकरीता मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,**

Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2026.07.10 17:31:13 +0530

**(श्रीमती.ए.एस.गुंजवटे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, निलंगा**
**जिल्हा लातूर.**

**दिनांक १०/०७/२०२६.**
**ठिकाण निलंगा.**